# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/03/2023 (शनिवार) दुपार

---

## जबर दुखापत

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ११ कि.मी. अंतरावरील मोहगाव चाफेगडी ता. कुही जि. नागपुर येथे दिनांक ०२/०३/२०२३ चे १८.३० वा. ते २०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. प्रियंका विनोद हिरेखन वय ३२ वर्ष, रा. मोहगाव चाफेगडी ता. कुही जि. नागपुर ही तिचे पती व मुलांसोबत राहत असुन शेत मजुरीचे काम करते. फिर्यादी हिचे सासऱ्याकडे ७ एकर शेती असुन त्याचे हिस्से झाले असून त्यातील ३ एकर फिर्यादी हिच्या पतीला व ३ एकर भासरे व आरोपी नामे— अनिल अंकुश हिरेखन रा. मोहगाव ता. मौदा जि. नागपुर यांना दिली आहे व सासऱ्याचे नावाने १ एकर शेती असुन सासरे फिर्यादी हिचे घरी राहत असुन भासरे वेगळे राहते त्यामुळे पती व सासरे यांचे मिळुन ४ एकर शेत होत असल्याने शेत ठेक्याने दिले आहे. त्यामुळे भासरे हे ठेक्याचे पैसे फिर्यादीच्या पतीला मागत असते दि. ०२/०३/२०२३ रोजी सायंकाळी ०६.३० वा. दरम्यान फिर्यादीचे भासरे हे घरी आले व फिर्यादी हिच्या पतीला २०,०००/— रू मागायला लागले तेव्हा पती यांनी पैसे देतो पण काही दिवस थांब असे म्हटले असता भासरे यांनी झगडा भांडण करून निघुन गेले व थोडया वेळाने घरी जावुन काठी घेवुन आले व फिर्यादी हिचा पतीला काठीने मारले त्यामुळे डोक्याला लागुन रक्त निघाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३२६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जगदीश बिरोले पो.स्टे मोदा मो. नं ९४०३७०१२६३ हे करीत आहे.

## घरफोडी

**१) पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील मौजा चोखाळा येथे दि. ०३/०३/२०२३ चे १४.३० वा. ते १८.०० वा. पर्यंत फिर्यादी नामे— प्रदिप नत्थुजी पिसे, वय ३२ वर्षे, रा. चोखाळा ता. रामटेक जि. नागपूर व त्यांची पत्नी दोघेही घराला कुलुप लावुन शेतात मजुरीने मिरची तोडण्याकरीता गेले असता फिर्यादी व पत्नी सायंकाळी ६.०० वा. दरम्यान मजुरीवरून घरी परत आले तेव्हा घराचे दरवाज्याला लावलेले कुलुप तुटलेले दिसले व दार टेकवलेले दिसले म्हणुन फिर्यादीने घराचे आत जावुन पाहीले असता घरातील हॉलमधील आलमारी खुली व सामान अस्ताव्यस्त लाकडी खाटेवर पडलेले दिसले आलमारीच्या लॉकरमध्ये ठेवलेला स्टीलचा डबा दिसला नाही. डब्यात नगदी १२,७००/— रू. ठेवले होते व आलमारीचे लॉकरमध्ये ठेवलेले जुने ७.५ ग्रॅम ची एकदानी त्यात ४० सोन्याचे मनी किंमती अंदाजे ६५०० रू/— असा एकुण १९२००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. ८०६ उमेश इंगळे मो. क्र. ९९२३४६३४६१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १३ कि. मी. अंतरावरील मौजा डोरली येथे दिनांक १७/२/२०२३ चे १७.०० वा. ते दिनांक ०२/०३/२०२३ चे १८.०० वा. पर्यंत फिर्यादी नामे– सौ. माला ज्ञानेश्वर धानकी, वय ५५ वर्ष रा. डोरली ता. पारशिवनी जिल्हा नागपूर यांच्या घराचे लॉक नसलेला दरवाजा उघडुन घराचे आत प्रवेश करून घरातील खिडकीला लटकलेल्या कथीया रंगाच्या बॅगमधुन एकुण ५००/– रू. चे ५६ नोटा एकूण नगदी रक्कम २८०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ८७८ मो. नं ९९२२९३५८७८ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०.५ कि. मी. अंतरावरील मौजा पारशिवनी येथे दिनांक ०३/०३/२०२३ चे १५.०० वा. ते १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. शालूबाई चिरकूट राजूरकर, वय ६५ वर्ष, रा. वार्ड क्र. १ पारशिवनी जिल्हा नागपूर यांचे राहते घराचे कुलूप उघडून घराचे आत प्रवेश करून बेडरूम मधील असलेल्या जर्मनच्या डब्यात असलेले नगदी ४०,०००/– रू. व लोखंडी पेटीतील एक सोन्याची पोत १० ग्रॅम वजनाची किंमती अंदाजे २५,०००/– रूपयाची असा एकुण ६५,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. १०८९ मो. नं. ९८८१२४१०८९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**